जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक -७९९ दिनांक - १०/११/२०२३**

सहकारनगर पोलिस स्टेशन पुणे शहर

## सनी शंकर जाधव (टोळी प्रमुख) व त्याचे इतर ०२ साथीदार यांचेविरूध्द मकोका कारवाई

दि.२५.१०.२०२३ रोजी फिर्यादी यांचे मेव्हणे याचेशी बबलु कोठारी यांची भांडणे झाली होती. सदरची भांडणे मिटविणे करीता फिर्यादी यांनी बबलु कोठारी यास शिळीमकर के.के. मार्केट,बालाजीनगर,पुणे येथे बोलाविले होते. फिर्यादी हे त्यांचा मित्र याची वाट पाहत उभे असताना,एका दुचाकीवर बबलु कोठारी व त्याचे साथीदार सलमान शेख,सनी जाधव असे गाडीवरून उतरून,फिर्यादीस हाताने मारहाण करीत असताना,त्यांचा मित्र भांडणे सोडविण्याचा प्रयत्न करत असताना,त्यास ढकलून दिले. तसेच सनी जाधव याने त्याचे पाठीमागे कमरेला लावलेला कोयता काढुन फिर्यादीचे उजव्या हातावर,उजव्या पायाच्या नडगीवर वार करून,त्यांना गंभीर जखमी करून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला. तसेच बबलू कोठारी व सलमान ऊर्फ सल्या शेख यांनी फिर्यादीस लाकडी बांबुने मारहाण करून,भांडणात मध्यस्थी करतोस काय,जास्त शहाणा झालास का, याला मारून टाकु,याला आता संपवायचाच असे बोलून,त्यांचे हातातील कोयता व लाकडी बांबू हवेत फिरवून आजू-बाजूच्या लोकांसमोर आम्हीच इथले भाई आहोत,कोणी नडला तर त्याला तोडणारच असे जोर-जोराने ओरडुन दहशत निर्माण केली. त्यानंतर ते सर्वजण गाडीवर बसून तेथून निघून गेले. म्हणुन सहकारनगर पोलीस स्टेशन गु.र.नं.**२७७/२०२३,भादविक ३०७,३२३,५०४,५०६,३४,आर्म ॲक्ट ४(२५),मपोकाक.३७(१)(३) सह १३५,क्रि.लॉ.अ.३ व ७** अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तपासा दरम्यान यातील आरोपी नामे **१)सलमान ऊर्फ सल्या हमीद शेख,वय २३ वर्षे,रा. बालाजीनगर,पुणे (टोळी सदस्य) २)वैभव ऊर्फ बबलु ऊर्फ मनोज विवेक कोठारी,वय २७,वर्षे रा.काशीनाथ पाटीलनगर,बालाजीनगर,धनकवडी,पुणे (टोळी सदस्य) यांना दाखल गुन्हयात अटक करण्यात आली असुन** ३)सनी शंकर जाधव,वय २१ वर्षे,रा.चैत्रबन वसाहत,अप्पर बिबवेवाडी,पुणे (टोळी प्रमुख) हा पाहिजे आरोपी आहे.

गुन्हयाचे तपासा मध्ये सदर आरोपी सनी शंकर जाधव (टोळी प्रमुख) व इतर साथीदारांसह स्वतःचे अधिपत्याखाली संघटीत गुन्हेगारी टोळी निर्माण केलेली असुन सदर गुन्हेगारी टोळीचे वर्चस्व काशिनाथ पाटीलनगर, बालाजीनगर, धनकवडी या परिसरामध्ये प्रस्थपित व्हावे,दहशत निर्माण व्हावी यासाठी त्यांनी आपल्या गुन्हेगारी टोळीचे वर्चस्व व आर्थिक फायदयासाठी सहकारनगर व बिबवेवाडी पोलीस ठाणे हद्दीत खुनाचा प्रयत्न, दरोडा टाकणे,मनुष्यवधाचा प्रयत्न, गंभीर दुखापत, बेकायदेशीर जमाव जमवून, लोकांमध्ये हल्ले करून, घातक शस्त्र जवळ बाळगुन त्याचा आपल्या टोळी सदस्यांकडुन गुन्हे घडवुन आणणे व दहशत निर्माण करणे, पोलीसांनी कायदा व सुव्यवस्था राखणेकामी काढलेल्या आदेशांचा भंग करणे,गुन्हयासाठी बेकायदेशीर घातक शस्त्राचा वापर करुन दहशत निर्माण करणे अशा प्रकारचे गंभीर स्वरूपाचे चढत्या क्रमाने गुन्हे दाखल आहेत.प्रत्येक गुन्हा करताना त्याने वैयक्तिक व टोळीचे वर्चस्व वाढविण्यासाठी तसेच जन माणसात दहशत रहावी हाच उद्देश ठेवुन गुन्हे केलेले आहेत. त्यांचेवर प्रतिबंधात्मक कारवाई करून देखील सुध्दा त्यांनी पुन्हा पुन्हा गुन्हे केलेले आहेत.

प्रस्तुत गुन्हयास महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ चे कलम ३(१)(ii),३(२), ३(४) प्रमाणेचा अंर्तभाव करणे कामी सहकारनगर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.सुरेंद्र माळाळे यांनी मा.पोलीस उप-आयुक्त,परि-०२,पुणे,श्रीमती.स्मार्तना पाटील यांचे मार्फतीने मा.अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग,श्री.प्रविणकुमार पाटील यांना प्रस्ताव सादर केलेला होता.

सदर प्रकरणाची छाननी करून सहकारनगर पोलीस स्टेशनकडील गुरनं.२७७/२०२३,भादविक ३०७, ३२३,५०४,५०६,३४,आर्म ॲक्ट ४(२५) मपोकाक.३७(१)(३) सह १३५,क्रि.लॉ.अ.३ व ७ प्रमाणे दाखल असलेल्या गुन्हयात महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ चे कलम ३(१)(ii),३(२),३(४) प्रमाणेचा अंर्तभाव करण्याची मा.अपर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशिक विभाग,श्री.प्रविणकुमार पाटील यांनी पुर्वमान्यता दिली आहे.

सदर गुन्हयाचा पुढील तपास मा.सहा.पोलीस आयुक्त,स्वारगेट विभाग,पुणे शहर,श्री.नारायण शिरगावकर हे करीत आहेत.

सदरची उल्लेखनिय कामगिरी मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार, मा.पोलीस सह आयुक्त श्री.संदिप कर्णिक, मा.अपर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशिक विभाग,श्री.प्रविणकुमार पाटील, मा.पोलीस उप-आयुक्त,परि-०२,पुणे,श्रीमती.स्मार्तना पाटील, मा.सहा.पोलीस आयुक्त स्वारगेट विभाग,पुणे,श्री.नारायण शिरगावकर यांचे मार्गदर्शनाखाली सहकारनगर पो. स्टे. चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.सुरेंद्र माळाळे पोलीस निरीक्षक,(गुन्हे),श्री.संदिप देशमाने, सर्व्हेलन्स पथकाकडील पोलीस अंमलदार,संजय गायकवाड, मंगेश खेडकर, पुजा तिडके, भाऊसाहेब आहेर यांनी केली आहे.

मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार यांनी पुणे शहर पोलीस आयुक्तालयाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर गुन्हेगारी नियंत्रणावर बारीक लक्ष देवुन,शरीराविरुध्द व मालमत्तेविरुध्द गुन्हे करणारे व समाजामध्ये दहशत निर्माण करणारे सराईत गुन्हेगार यांचे हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवुन गुन्हेगारीचे समुळ उच्चाटन होईल यावर भर देण्याबाबत सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांना निर्देश दिले आहेत. **त्यांचे मार्गदर्शना खाली मकोका अंतर्गत केलेली चालु वर्षातील ही ८२ वी कारवाई आहे.**